अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


## पथुम निसंकाचे शतक; श्रीलंका विजयी, ऑस्ट्रेलियाचे पॅकअप

**पल्लेकेले :** पथुम निसंकाच्या शानदार शतकाच्या जोरावर श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाचा ८ विकेटने पराभव करत सुपर ८ मध्ये थाटात प्रवेश केला. या पराभवामुळे ऑस्ट्रेलियाचे विश्वकपमधून पॅकअप निश्चित झाले आहे. विजयासाठी १८२ धावा श्रीलंकने १८ षटकात दोन विकेटच्या मोबदल्यातच पूर्ण केले. निसंकाने ५२ चेंडूत १० चौकार आणि ५ षटकाराच्या मदतीने नाबाद १०४ धावा केल्या तर कुसल मेंडिसने ३८ चेंडूत ५१ धावा केल्या. रत्ननायकेने १८ चेंडूत नाबाद २८ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला.

श्रीलंकेने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर ऑस्ट्रेलिया संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आले. प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड या सलामी जोडीने ८.२ षटकांत १०० धावा केल्या. एक वेळ वाटत होते ऑस्ट्रेलिया २०० चा आकडा सहज पार करेल. परंतु २० षटकांत सर्वबाद १८१ धावांतच त्यांचा संघ बाद झाला.

मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड वगळता कोणत्याही ऑस्ट्रेलियन फलंदाजाला आपली छाप पडता आली नाही. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने ५६ आणि मिचेल मार्शने ५४ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा एकेकाळी शून्य विकेटवर १०४ धावसंख्या होती, परंतु नंतर संघ १८१ गारद झाला.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ । ▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : १४० वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२

### सोलापूर शहरावर शोककळा


# भल्या पहाटे घरी निघाले, वाटेत काळाने घेरले





## अज्ञात वाहनाच्या धडकेने तीन अविवाहित तरुण ठार

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सोमवारी सकाळी एक दुर्दैवी वार्ता कानी पडल्यानंतर सोलापूर शहरावर शोककळा पसरली.एका मोटारसायकवर तिघे तरूण भल्या पहाटे भरधाव वेगात आपल्या घरी निघाले होते.वाटेतच एक वाहन त्यांच्यासाठी कर्दनकाळच ठरले.त्या वाहनाच्या धडकेने हे तिघेही जागीच ठार झाले. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा अपघात झाला. हे तिघे तरुण दुचाकीवरून घरी निघाले होते मात्र ते कोठून निघाले होते याची माहितीच नसल्याने या अपघाताचे गूढ वाढले आहे.दिवसभर तपास केल्यानंतर पोलिसांनी एक संशयित आयशर टेम्पो पकडून पुढचा तपास हाती घेतला आहे.**


नागेश गवंडी


बसवराज चानरोट्टी


रोहन कोरे

नागेश प्रकाश गवंडी (वय २५, रा. राजेंद्र चौक,), रोहन कोरे (वय २४, रा. सोलापूर शहर) आणि प्रज्वल चनशेट्टी (वय २५, रा. शेळगी सोलापूर) असे मृत तीन तरुणांची नावे असून ते तिघेही अविवाहित होते,असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या अंदाजानुसार हा अपघात असल्याचे समजते. मात्र, जोडभावी पेठ पोलीस कसून तपास करत आहेत. मृत नागेश गवंडी याच्या बहिणींने माध्यमांसमोर बोलताना संशय व्यक्त केला आहे. माझ्या भावाला जास्त मार लागलेला नाही. तर त्याचा मृत्यू कसा होतो?,असा प्रश्न तिने उपस्थित केला आहे. मात्र, पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार एका अवजड वाहनाने धडक दिल्याची माहिती समोर येत आहे. जोडभावी पेठ पोलीस स्टेशन मधील अधिकारी हे अपघात स्थळींचा वेगवेगळ्या ठिकाणी लावलेल्या सीसीटीव्हींचे तपास करत आहेत.

**घरी कधी येणार...**

नागेश गवंडी हा सोलापूर जिल्ह्यातील एका टोल नाक्यावर सुपर वायझरचे काम करत होता. महाशिवरात्री असल्याने नागेश गवंडी हा घरी आला होता. नागेश हा रविवारी रात्री रोहन आणि प्रज्वल यांच्यासोबत बाहेर गेला होता. रात्री १२ वाजता नागेशच्या बहिणीने फोन केला घरी कधी येणार आहे. नागेशने सांगितले होते, येतो. मित्रांसोबत आहे. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास पोलिसांचा फोन आला आणि जाऊन नागेशचा मृतदेह दाखविण्यात आला, अशी माहिती नागेशच्या बहिणीने शासकीय रुग्णालयात बोलताना दिली.

नागेश प्रकाश गवंडी हा नातेपुते येथील टोल नाक्यावर कामास होता. रोहन कोरे हा बजाज फायनान्स कंपनीमध्ये कामाला होता. तर प्रज्वल चनशेट्टी हा एका खासगी कंपनीत कामास होता. तिघेही तरुण पंचविशीतील आहेत. तीन तरुण मुलांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सोलापुरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गवंडीच्या पश्चात आई,बहीण,भाऊ असा परिवार आहे.पाच महिन्यांपूर्वी त्याच्या वडिलांना देवाज्ञा झाली होती.रोहनच्या पश्चात आई-वडील,भाऊ आणि बहीण तर चनशेट्टीच्या पश्चात आई-वडील आहेत. शवविच्छेदन झाल्यानंतर सायंकाळी त्यांचे मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.



सोलापूर : अपघातस्थळचा पंचनामा करताना पोलीस अधिकारी.

# गुपचूप खिरापत वाटणाऱ्या सरकारी बाबूंच्या मुसक्या आवळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उचलले कठोर पाऊल

**मुंबई :** सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांना उल्लूत काढून आपल्या तुंबड्या कशा भरून घ्यायच्या ही टॅक्ट सरकारी बाबू वेळसाधून लढवत असतात.असाच एक धक्कादायक प्रकार मंत्रालयात उघडकिस आल्याने सनदी अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्यावर शोककळा पसरली होती. सरकारकडून शासकिय दुखवटा जाहीर करण्यात आला होता. त्याचवेळी पवार यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्याक विभागात धक्कादायक प्रकार घडला. पवार यांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात अल्पसंख्याक विभागात सह्यांचा सपाटा सुरु होता. या विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईत अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. अधिकाऱ्यांची ही खाबूगिरी समजताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पाऊल उचलत या निर्णयाला स्थगिती दिली आणि वरिष्ठ पातळीवर चौकशीचे आदेश दिले. झाले असे की, अजित पवार हयात असताना त्यांनी ज्या फाईल्स पेंडिंग ठेवल्या होत्या, त्या फाईल्सवर त्यांच्या निधनानंतर, त्याच दिवशी घाईघाईत स्वाक्षरी करण्यात आल्या. ऑगस्ट २०२५ पासून या शाळांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. पण अजित पवार यांचे अपघाती निधन होताच अल्पसंख्यांक विभागातील अधिकाऱ्यांनी स्थगिती डालवून अल्पसंख्यांक प्रम ाणपत्रांचे वाटप केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अजित पवारांचे निधन झाले. त्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास अल्पसंख्यांक विभागाकडून शाळांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.




सर्व नियम पायदळी तुडवून, संवेदनशीलता गुंडाळून ७५ शाळांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आल्याचे प्रकरण गाजले. त्यानंतर या प्रकरणाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाला स्थगिती दिली आहे. उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दोषींच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर गुपचूपपणे प्रमाणत्रांची खिरापत वाटणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रकरणात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी केला आहे. या प्रकरणात त्यांनी कारवाईची मागणी केली आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनीदेखील आक्रमक भूमिका घेतली. सदर शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचा हा प्रकार धक्कादायक असून संबंधित अधिकाऱ्यांची सीआयडीमार्फत चौकशी करत कारवाई करावी, अशी मागणी प्यारे खान यांनी केली आहे.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



परीक्षेत कॉपी पुरवत असतील तर अभ्यास कशाला करायचा ?

कल्याण
270-94-789

मुंबई
125-85-168


### हम्पीतील अत्याचार-हत्या प्रकरणी

# त्या ३ नराधमांना फासावर लटकवण्याचे आदेश



## इस्त्रायली महिलेला न्याय, कोर्टाचा ऐतिहासिक निकाल

**बंगळुरू :** संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या बेल्लारी जिल्ह्यातील हम्पीम धील सामूहिक बलात्कार आणि हत्या प्रकरणात कर्नाटकच्या गंगावती सत्र न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. एका परदेशी इस्त्रायली महिला पर्यटकावर आणि होमस्टेच्या मालकिणीवर बलात्कार करून एका पर्यटकाची हत्या करणाऱ्या तीन नराधमांना न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे.विधी क्षेत्रात कठोर असणारी फाशीची शिक्षा असावी की,नसावी यावर खल सुरू असतानाच या न्यायालयाने मृत्यूदंडाची शिक्षा सुनावल्याने नराधमांना असलीच शिक्षा हवी,असा मतप्रवाह द`शात





दिसून येत आहे.

मल्लेश उर्फ हांडीमल्ला, साई आणि शरणप्पा अशी फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या दोषींची नावे आहेत. २६ मार्च २०२५ रोजी घडलेल्या या गुन्ह्याला रेअर ऑफ द रेयरेस्ट ठरवत जिल्हा आणि सत्र न्यायाधीश सदानंद नागप्पा नायक यांनी ही कठोर शिक्षा सुनावली.

ही घटना २६ मार्च २०२५ रोजी रात्री ११ ते ११:३० च्या सुमारास हम्पी जवळील सनापूर तलावाच्या परिसरात घडली होती. २९ वर्षीय होमस्टे मालकिण आपल्या चार पुरुष पाहुण्यांसोबत (ज्यात अमेरिका, महाराष्ट्र आणि ओडिशाचे पर्यटक होते) आणि एका इस्त्रायली महिला पर्यटकासोबत तुंगभद्रा कालव्याच्या काठावर बसली होती. तिथे अचानक दुचाकीवरून तीन आरोपी आले. सुरुवातीला त्यांनी पेट्रोल पंप कुठे आहे, अशी विचारणा केली. त्यानंतर त्यांनी इस्त्रायली महिलेकडे १०० रुपयांची मागणी केली. पर्यटकांनी पैसे देण्यास नकार दिल्यावर आरोपींनी शिवीगाळ करत त्यांच्यावर हल्ला चढवला.

**सामूहिक बलात्कार आणि पळ काढला**

पुरुष पर्यटक कालव्यातून बाहेर निघण्यासाठी संघर्ष करत असतानाच, या नराधमांनी इस्त्रायली पर्यटक आणि होमस्टे मालकिणीवर सामूहिक बलात्कार केला. या घटनेनंतर आरोपी पसार झाले होते. मात्र, विशेष पोलीस पथकाने तपास करून त्यांना बेड्या ठोकल्या.

**देशाच्या प्रतिमेला धक्का...**

तपासादरम्यान मिळालेले पुरावे, पीडितांचे जबाब आणि फॉरेन्सिक रिपोर्टच्या आधारे न्यायालयाने तिघांनाही दोषी धरले. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या हम्पी सारख्या ठिकाणी परदेशी पर्यटकांसोबत घडलेला हा गुन्हा देशाच्या प्रतिमेला धक्का लावणारा ठरला होता. त्यामुळेच समाजात कडक संदेश जावा यासाठी न्यायालयाने या नराधमांना फासावर लटकवण्याचे आदेश दिले आहेत.

**पर्यटकाला कालव्यात फेकले**

जेव्हा पुरुष पर्यटकांनी महिलांना वाचवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपींनी तिन्ही पुरुष पर्यटकांना जबरदस्तीने तुंगभद्रा कालव्याच्या पाण्यात ढकलून दिले. यात ओडिशातील एका पर्यटकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला, ज्याचा मृतदेह सकाळी तलावात सापडला. इतर दोन पर्यटक जखमी अवस्थेत बाहेर पडले.